पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन,
12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २५२ वा | सोमवार, दि. १८ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# शक्तीपीठ महामार्गाविरोधात सोलापुरातील शेतकरी संतप्त

## शक्तीपीठ महामार्गासाठी एक इंच ही जमीन देऊ नका : राजू शेट्टी

### पुणे-सोलापूर महामार्ग ठप्प | राजू शेट्टी पोलिसांत शाब्दिक चकमक





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात सोलापूर जिल्ह्यात आज तीव्र आंदोलन छेडण्यात आले. संत सावता माळी यांच्या संजीवन समाधीस्थळासाठी ओळखल्या जाणाऱ्या अरणसह पंचक्रोशीतील गावांतील बाधित शेतकऱ्यांनी पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करत वाहतूक रोखून धरली.

त्यामुळे महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे.

महामार्गावर रास्ता रोकोवरून राजू शेट्टी आणि सोलापूर पोलिस यांच्यात शाब्दिक चकमक आंदोलन मोडून काढण्याचा पोलिसांचा प्रयत्न असल्याचा आरोप राजू शेट्टींनी केला.

शेतकरी नेते राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात येत आहे. मोठ्या संख्येने शेतकरी महामार्गावर उतरले असून शक्तीपीठ महामागार्साठी संपादित होणाऱ्या जमिनींना तीव्र विरोध दर्शवित आहेत. "शेती वाचवा, गाव वाचवा" अशा घोषणा देत आंदोलकांनी शासनाविरोधात संताप व्यक्त केला.

अरण गावातील ७५ वर्षीय महिला शेतकरी रतन निवृत्ती पाटील यांनी भर तळपत्या उन्हात रस्त्यावर बसून आंदोलनात सहभाग घेतला. त्यांच्या या सहभागामुळे आंदोलनाला भावनिक स्वरूप प्राप्त झाले. "जमीन गेली तर जगायचं कसं?" असा सवाल त्यांनी उपस्थित करत सरकारने शेतकऱ्यांच्या भावना समजून घ्याव्यात, अशी मागणी केली.

अरणसह पंचक्रोशीतील शेतकऱ्यांचा आरोप आहे की, शक्तीपीठ महामागार्मुळे सुपीक शेती जमीन बाधित होणार असून अनेक कुटुंबांचे उपजीविकेचे साधन हिरावले जाणार आहे. संत सावता माळी यांच्या संजीवन समाधी परिसरालाही या प्रकल्पाचा फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे स्थानिकांनी या प्रकल्पाला सुरुवातीपासूनच विरोध दर्शविला आहे.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर घटनास्थळी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस प्रशासन सतर्क झाले असून आंदोलकांना शांततेच्या मागार्ने आंदोलन करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. दरम्यान, महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली असून प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे.

माढा व माळशिरस तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी सुमारे पाऊण तास हा महामार्ग रोखून धरला. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे सचिन पाटील, शिवाजी पाटील, सचिन रणदिवे, सिद्धेश्वर घुगे, अजित बोरकर, जि. प. चे माजी सभापती संजय पाटील घाटणेकर, ॲड. विजय शिंदे आदी उपस्थित होते. राजू शेट्टी म्हणाले, महाराष्ट्रातील देवस्थान जोडणार, शेतकऱ्यांना प्रचंड पैसे मिळणार या सरकारच्या भूलथापावर विश्वास ठेवू नका. चाळीस हजार कोटींचा हा महामार्ग सरकारने एक लाख कोटींवर नेला आहे. पुढील निवडणुकीची तजवीज म्हणून सरकारचा हा अट्टाहास आहे. या प्रस्तावित मागार्ला समांतर असा नागपूर रत्नागिरी राष्ट्रीय महामार्ग असताना शक्तिपीठचा आग्रह कशासाठी? कोल्हापूर जिल्ह्यातून आम्ही विरोध केल्याने हा महामार्ग तुमच्यावर लादला जात आहे.

**एजंटांच्या नादी लागू नका**

प्रास्तावित महामार्गावर अनेक शेतकऱ्यांनी आंबा व इतर फळझाडांची लागवड केली आहे. यावर बोलताना शेट्टी यांनी शेतकऱ्यांनी एजंटाच्या भूलथापांना बळी न पडण्याचे आवाहन केले. सॅटेलाइट सर्वेमुळे नव्याने लागवड झालेल्या बागांचा काही उपयोग होणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

## जुळे सोलापुरातील होंडा दुचाकी गोडाऊनला भीषण आग; २५ लाखांचे नुकसान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जुळे सोलापुरातील वानकर नगर परिसरात असलेल्या होंडा दुचाकी गोडाऊनला सोमवारी सकाळी अचानक भीषण आग लागल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. पत्र्याच्या शेडमध्ये असलेल्या या गोडाऊनमध्ये काही क्षणांतच आगीने विक्राळ रूप धारण केले. या घटनेत अंदाजे २५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, महापालिका अग्निशमन दलाच्या वेळीच केलेल्या कारवाईमुळे तब्बल दोन कोटी रुपयांचा दुचाकी व साहित्यसाठा वाचवण्यात यश आले.

वानकर नगर येथील देविका गॅस एजन्सीजवळ प्लॉट क्रमांक ३१४ मध्ये हे गोडाऊन आहे. सोमवारी सकाळी सुमारे ११.१४ वाजण्याच्या सुमारास येथे आग लागल्याची माहिती महापालिका अग्निशमन दलाला मिळाली. गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात दुचाकी वाहने तसेच त्यांचे स्पेअर पार्ट्स आणि अन्य साहित्य साठवलेले होते. आगीमुळे परिसरात धुराचे मोठे लोट पसरले होते, तर ज्वाळा दूरवरूनही दिसत होत्या. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे अधीक्षक राकेश साळुंखे यांच्या आदेशानुसार होटगी नाका अग्निशमन केंद्रातील पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी त्वरित बचावकार्य सुरू करत आग आणखी पसरण्यापूर्वी नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न केले. अग्निशमन दलाच्या सहा गाड्यांनी पाण्याचा मारा करत अवघ्या पाऊण तासात आग आटोक्यात आणली. अधीक्षक राकेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक अधीक्षक अच्युतराव दुधाळ यांच्या नेतृत्वात जवानांनी शर्थीचे प्रयत्न केले. त्यामुळे गोडाऊनमधील मोठ्या प्रमाणातील दुचाकी वाहने आणि इतर साहित्य आगीपासून सुरक्षित ठेवण्यात यश आले. या कारवाईमुळे सुमारे दोन कोटी रुपयांचा माल वाचल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, आगीत स्पेअर पार्ट्स आणि इतर साहित्य जळून अंदाजे २५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

संबंधित ठिकाणी दुचाकींना ॲक्सेसरीज बसविण्याचे कामही सुरू असल्याची माहिती समोर आली. घटनेनंतर परिसरात नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

## खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

### टेंभुर्णी-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग होणार फोर लेन; नितीन गडकरी यांची घोषणा

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माढा लोकसभा मतदारसंघातील महत्त्वाचा प्रश्न असलेल्या टेंभुर्णी-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५६१एच्या चौपदरीकरणाला अखेर गती मिळाली असून फलटण ते पंढरपूर पालखी मार्गाच्या पाहाणी दौऱ्यावर असताना केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी यांनी या महामार्गाच्या फोरलेन टेंभुर्णी पंढरपूर फोरलेन महामागाची घोषणा केली.



खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी टेंभुर्णी ते पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. वाढती वाहतूक, वारकऱ्यांची मोठी संख्या, अपघातांचे वाढते प्रमाण आणि वाहतूक कोंडी यामुळे हा मार्ग फोरलेन करण्याची मागणी त्यांनी दिल्ली येथे नितीन गडकरी यांना निवेदनाद्वारे भेटून केली होती.


या मागणीची दखल घेत केंद्रीय मंत्री गडकरी यांनी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांना पाठविलेल्या पत्रात टेंभुर्णी-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी डीपीआर (सविस्तर प्रकल्प अहवाल) तयार करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे सांगितले होते. डीपीआर अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही नमूद केले होते.

पंढरपूर हे देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी एक असून आषाढी व कार्तिकी वारीदरम्यान लाखो भाविक येथे येतात. तसेच हा मार्ग NH-65 आणि NH-965 यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा असून अनेक गावं, बाजारपेठा आणि साखर कारखान्यांसाठीही अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे या महामार्गाच्या चौपदरीकरणामुळे वाहतूक सुलभ होऊन अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मोठी मदत होणार आहे.

खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या महत्त्वाच्या प्रकल्पाला चालना मिळाल्याने माढा लोकसभा मतदारसंघातील नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## सोलापूरचा पारा ४४ अंशांवर; मे अखेरपर्यंत उन्हाची तीव्रता आणखी वाढणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** चालू उन्हाळी हंगामात सोलापूरच्या तापमानाने आतापर्यंतचा उच्चांक गाठला असून, आज 17 मे 2026 रोजी कमाल तापमान ४४ अंश सेल्सिअसवर पोहोचले आहे. विशेष म्हणजे, किमान तापमानही २८.४ अंश सेल्सिअस एवढे नोंदवले गेल्याने सोलापूरकरांना दिवसा पाठोपाठ रात्रीही असह्य उकाड्याचा सामना करावा लागत आहे. हवामान अभ्यासकांच्या मते, मे महिन्याच्या अखेरपर्यंत तापमानाचा हा आलेख आणखी वर जाण्याची शक्यता असून, नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



**एप्रिल आणि मे महिन्यातील तापमानाचा चढ-उतार**

या हंगामात २७ एप्रिल रोजी ४३.९ अंश सेल्सिअस इतक्या उच्चांकी तापमानाची नोंद झाली होती. त्यानंतर मे महिन्याच्या सुरुवातीला, म्हणजेच २ मे रोजी तापमान अंमळ घटून ४२.८ अंशांवर आले होते. हा या हंगामातील मे महिन्यातील सर्वात कमी तापमानाचा दिवस ठरला. मात्र, हा दिलासा फार काळ टिकला नाही. अवघ्या काही दिवसांतच तापमानाने पुन्हा उसळी घेतली असून, आज तो ४४ अंशांवर जाऊन पोहोचला आहे.

**रात्रीचा उकाडा वाढला; जमिनीला मिळेना विश्रांती**

कमाल तापमानासोबतच किमान तापमान २८.४ अंश सेल्सिअस इतके वाढल्यामुळे रात्रीच्या वातावरणातही कमालीचा उकाडा निर्माण झाला आहे. दिवसभर तापलेली जमीन रात्रीही थंड होत नसल्याने नागरिक रात्रीच्या वेळीही घामाघूम होत आहेत. मे महिन्याच्या उत्तरार्धात ही स्थिती अशीच राहण्याची चिन्हे आहेत.

**मे अखेरपर्यंतची स्थिती कशी असेल?**

हवामान तज्ज्ञांच्या विश्लेषणानुसार, मे महिन्याच्या उर्वरित दिवसांत सोलापूरमधील उन्हाची तीव्रता कायम राहणार आहे. तापमान ४५ अंशा पार जाण्याचा धोका: मे च्या तिसऱ्या आणि चौथ्या आठवड्यात पारा ४४.५ ते ४५.५ अंश सेल्सिअसच्या आसपास पोहोचण्याची दाट शक्यता आहे. पुढील काही दिवस तापमान असेच चढे राहिल्यास जिल्ह्यात 'उष्णतेची लाट' येण्याची शक्यता नाकारता येत नाही. मे अखेरीस वळवाचा पाऊस २५ मे नंतर अरबी समुद्राकडून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्यांमुळे हवेतील आर्द्रता वाढेल. यामुळे दुपारनंतर ढगाळ वातावरण निर्माण होऊन महिनाअखेरीस वादळी वाऱ्यासह वळवाचा पाऊस सोलापूर जिल्हा झोडपू शकतो, असा अंदाज आहे.

**प्रशासनाचे नागरिकांना आवाहन**

उन्हाची ही तीव्र लाट पाहता नागरिकांनी दुपारच्या वेळी (१२ ते ४) अत्यंत महत्त्वाचे काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये.

आज 17 मे 2026 रोजी यंदाच्या उन्हाळ्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली आहे.

कमाल : 44.0°C
किमान : 28.4°C

## नवीन मिळकती शोधण्यात निष्काळजीपणा महागात; ३५ हजार ५०० रुपयांचा दंड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नवीन मिळकतींचा शोध घेऊन मालमत्ता कर आकारणी करण्याच्या मोहिमेत हलगर्जीपणा केल्याप्रकरणी महापालिकेच्या मालमत्ता कर विभागातील १९ कर निरीक्षकांवर आर्थिक दंडाची कारवाई करण्यात आली आहे.

संबंधित कर्मचाऱ्यांकडून एकूण ३५ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात येणार आहे. यासंदर्भातील आदेश महापालिका उपायुक्त सोनाली यादव यांनी जारी केले आहेत.

महापालिका प्रशासनाने ८ एप्रिल २०२६ रोजीच्या आदेशानुसार सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना नवीन मिळकतींचा शोध घेणे तसेच अपार्टमेंटमधील शिल्लक फ्लॅट आणि गाळ्यांची दररोज किमान पाच मिळकतींची कर आकारणी करण्याचे उद्दिष्ट दिले होते. एप्रिल महिन्यात विशेष मोहीम राबवून नवीन मिळकती करजाळ्यात आणण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या.



मात्र,15 मेपर्यंतच्या सर्वेक्षण आणि आकारणी अहवालाचा आढावा घेतल्यानंतर काही कर्मचाऱ्यांनी दिलेले उद्दिष्ट पूर्ण केले नसल्याचे स्पष्ट झाले. वारंवार सूचना आणि आदेश देऊनही संबंधितांच्या कामकाजात अपेक्षित सुधारणा दिसून आली नाही, असे प्रशासनाच्या निदर्शनास आले.

या निष्काळजीपणाबाबत संबंधित कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. तरीही समाधानकारक कामगिरी न झाल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६(२)(ड) अंतर्गत आर्थिक दंडाची कारवाई करण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

## पंढरपुर शहरात जनगणनेच्या दुसऱ्या भागाला सुरुवात- मुख्याधिकारी रोकडे

### जनगणनेसाठी 25 पर्यवेक्षक व 150 प्रगणकांची नियुक्ती

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर शहरात जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात नागरिकांना डिजिटल जनगणना करण्यासाठी 01 ते 15 मे दरम्यान मुदत दिली होती. यातील पहिल्या टप्प्यातील दुसऱ्या भागाला शनिवार (ता.16) पासून सुरवात झाली आहे. यात प्रगणक प्रत्येक घरी जाऊन घरयादी व घरगणनेचे काम करणार आहेत. स्वगणना केली नसल्यास तरी देखील घरगणनेचे काम प्रगणक करतील. यासाठी नागरीकांनी आलेल्या प्रगणकांना अचूक माहिती द्यावी. असे आवाहन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.



दिनांक 16 मे ते 14 जून 2026 या कालावधीतील दुसऱ्या टप्प्याच्या प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात झालेली असून, जनगणना संचालनालय सह संचालक रमेश भोसले यांनी प्रत्यक्ष भेट देवुन बोहरी पेट्रोल पंप येथील भागातील सुरु असलेल्या कामाची माहिती घेतली व त्या भागाचे प्रगणक, पर्यवेक्षक यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांचे समवेत जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथील जनगणना अधिकारी,उपस्थित होते. पंढरपूर शहरात जनगणनेचे प्रत्यक्ष कामकाज करण्याकरिता 25 पर्यवेक्षक व 150 प्रगणकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. जनगणनेसाठी नागरीकांनी प्रगणकांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहनही मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.

## अनंत जाधव यांच्या नगरसेवकपदावर टांगती तलवार?

### माहिती लपवल्याचा आरोप; उच्च न्यायालयात याचिका दाखल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या सन २०२५-२६ च्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक ४ (ड) मधून विजयी ठरलेले नगरसेवक अनंत ज्ञानेश्वर जाधव यांच्याभोवती आता मोठे कायदेशीर वादळ निर्माण झाले असून, त्यांच्या नगरसेवकपदावर टांगती तलवार असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगू लागली आहे. निवडणूक प्रतिज्ञापत्रात महत्त्वाची माहिती हेतुपुरस्सर लपविल्याचा गंभीर आरोप करत मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यासाठी याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेमुळे सोलापूरच्या राजकीय क्षेत्रात एकच खळबळ उडाली असून, आगामी काळात या प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, मतदारांचा माहितीचा अधिकार आणि उमेदवारांची जबाबदारी या मुद्द्यांवरही या निमित्ताने नव्याने चर्चा सुरू झाली आहे.



याचिकेत करण्यात आलेल्या आरोपांनुसार, भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढवून विजयी झालेले अनंत जाधव यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना त्यांच्या (पान 2 वर..)

## संपादकीय

# जरा गांभीर्याने घ्या...

या आठवड्यामध्ये वैद्यकीय पदवी प्रवेशांसाठी घेण्यात आलेल्या 'नीट' परीक्षेचे पेपर फुटल्यामुळे ती संपूर्ण परीक्षा रद्द करून आता पुन्हा नव्याने घेण्याचा निर्णय झाला. आता दोन महिन्यांच्या अंतराने ती परीक्षा पुन्हा होईल. या परीक्षेला बसलेले काही लाख विद्यार्थी व त्यांचे पालक यामुळे निराश झाले असतील; पण या सर्व विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा या परीक्षेच्या तयारीसाठी कंबर कसावी लागेल. परीक्षा झाली म्हणून आलेला निवांतपणा झटकून पुन्हा एकदा परीक्षेची तयारी करणे, त्यासाठी मानसिक तयारी करणे आणि पुन्हा एकदा आपला अभ्यास त्या पातळीवर नेण्यासाठी धडपडणे ही खरोखरच अवघड गोष्ट आहे; किंबहुना ते मोठे आव्हान आहे. पण कोणाच्या तरी हव्यासाची शिक्षा लक्षावधी विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना मिळाली, हे नक्की. या सगळ्याकडे मुळातून बघण्याची गरज आहे. वैद्यकीय शिक्षण हे आपल्या शैक्षणिक व्यवस्थेमध्ये सर्वोच्च स्थानावर आहे. याचे मूळ कारण म्हणजे हे शिक्षण घेण्याची संधी अतिशय मर्यादित आहे. स्वातंत्र्यानंतर आपण आरोग्य व्यवस्थेवर पुरेसे काम केलेले नाही. अजूनही परिस्थिती तशीच आहे. मलेशिया, थायलंड, सिंगापूर या सारख्या देशांमध्येही सरकारी आरोग्यव्यवस्था ही नव्वद ते पंचाण्णव टक्के नागरिकांच्या आरोग्याची सोय करते. ती अत्यल्प पैशांमध्ये मिळते. अमेरिका व युरोपमध्ये आरोग्यविमा तुमच्या खर्चाची काळजी घेतो. दुर्दैवाने आपण या दोन्ही पद्धतींकडे पुरेसे लक्ष दिलेले नाही. आपल्याकडची सरकारी रुग्णालये कितीही चांगले काम करत असली तरी त्यांच्याकडे येणाऱ्या रुग्णांची संख्याच इतकी प्रचंड असते की ही व्यवस्था कोलमडून पडते. आजही मुंबईच्या जेजे किंवा पुण्यातल्या ससून रुग्णालयांमध्ये मंजूर रुग्णसंख्येच्या किमान दुप्पट रुग्ण दाखल असतात, मग त्यांची सोय जमिनीवरील बेडवरच केली जाते, यात आश्चर्य नाही. हीच गोष्ट वैद्यकीय शिक्षणाची. हाताच्या बोटावर मोजता येतील इतकीच वैद्यकीय महाविद्यालये, त्यामुळे त्यामध्ये प्रवेश मिळणे ही फार मोठी गोष्ट समजली जाते. पूर्वी बारावीच्या परीक्षेतील गुणांवर हे प्रवेश मिळत. मात्र स्पर्धा तीव्र झाल्यानंतर या प्रवेशांसाठी वेगळी प्रवेश परीक्षा आली. मग संपूर्ण देशामध्ये एकच प्रवेश परीक्षा हवी यातून 'नीट' सारख्या परीक्षेचा जन्म झाला. त्यासाठी वेगळी यंत्रणा उभी राहिली. दुर्दैवाने ही यंत्रणा पुरेशी सक्षम नाही. कारण गेल्या तीन वर्षांत अशा प्रकारे प्रवेश परीक्षेचे पेपर फुटण्याची ही दुसरी वेळ आहे. आता ही परीक्षा जून महिन्यात होईल. त्यानंतर निकाल लागण्यासाठी किमान महिना ते दीड महिना लागेल. मग प्रवेश प्रक्रिया. त्यामध्ये राष्ट्रीय स्तरावरील राखीव प्रवेश, राज्यस्तरावरील प्रवेश, विविध आरक्षणे.... हे होताना त्यामध्ये न्यायालयातील याचिका असतीलच. त्यामुळे हे प्रवेश पूर्ण होऊन प्रत्यक्ष महाविद्यालये सुरू होण्यासाठी सप्टेंबर महिना उजाडेल. वास्तवामध्ये पहिले सत्र ऑक्टोबर महिन्यात संपणे अपेक्षित असते. वैद्यकीय प्रवेशासाठीची स्पर्धा अतिशय तीव्र बनल्याने त्याच्या तयारीसाठी कोचिंग क्लासेस आले. आता तर दहावीच्या आधीपासूनच या परीक्षांची तयारी करून घेणारे क्लासेस आहेत. त्यासाठी पालक लक्षावधी रुपये खर्च करतात. त्यासाठी गाव, घर सोडून मोठ्या शहरांमध्ये दोन-अडीच वर्षांसाठी राहण्यास येणाऱ्यांची संख्या हजारांमध्ये आहे. पूर्वी आयएएस परीक्षेसाठी दिल्लीमध्ये जायची पद्धत होती. मग आयआयटीसाठी कोटा प्रसिद्ध झाले; आता या वैद्यकीय शिक्षणासाठी सर्व महानगरे प्रसिद्ध आहेत. तेथे मोठमोठ्या कोचिंग क्लासच्या चकचकीत इमारती आहेत, त्यांचे मोठे शुल्क आहे. परवडते त्यांनी या वाटेला जावे. गरिबाने जमले तर परीक्षा देऊन बघावी, मिळाले यश तर प्रवेश घ्यावा; अन्यथा वेगळी वाट निवडावी, असा हा सगळा रोकडा व्यवहार. फीचा आकडा दर वर्षी वाढवायचा तर जाहिरात करण्यासाठी आपल्या अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला पाहिजे. त्यासाठी प्रश्नपत्रिकाच फोडली तर काम अधिक सोपे होईल, अशा चक्रव्यूहातून ही स्थिती निर्माण होते. आताही उघडकीस येत असलेला प्रकार याच साखळीतला आहे. एका प्राध्यापकाला झालेली अटक याकडे अंगुलीनिर्देश करते आहे. हे सगळे उघडकीला आल्यानंतर अनेक प्रश्न पडतात. राष्ट्रीय स्तरावरील एकच परीक्षा घेण्याचा अट्टाहास का, येथपासून ते एवढे तंत्रज्ञान विकसित झाल्यानंतरही पेपरफुटी होतेच कशी, येथपर्यंतचे हे प्रश्न आहेत. आता पुढील वर्षी ही परीक्षा संगणकाद्वारे घेण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे, पण या वर्षी झालेल्या मनस्तापाची किंमत कोण मोजणार, याचे उत्तर केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिलेले नाही. एकूणच आपण या प्रकाराकडे अजूनही गंभीरपणे बघण्यास तयार नाही, असेच चित्र उभे राहते. अर्थात आपण कशातच गंभीर नाही, हे वारंवार दिसतेच. याच आठवड्यात पंतप्रधानांनी एकूण जागतिक परिस्थिती पाहून बचतीचे आवाहन केले आहे. सोने खरेदी करू नका, परदेश प्रवास टाळा येथपासून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था वापरा येथपर्यंतचे ते आवाहन आहे. ते गरजेचे होते का, निवडणुका संपेपर्यंत ते करण्यास विलंब का केला, येथपासून स्वतः पंतप्रधान त्याकडे गंभीरपणे बघणार का. येथपर्यंत अनेक प्रश्न निर्माण होतात. ही उत्तरे मागताना या प्रकरणातील गांभीर्यच आपण घालवितो आहोत, हे मात्र आपण विसरतो. युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन उपलब्धतेवर मोठा परिणाम होणार आहे व त्यासाठी मोठे परकीय चलन खर्ची टाकावे लागणार आहे, हे प्रत्येकाला माहिती आहे. सोने तातडीने खरेदी केले नाही तरी फार काही बिघडणार नाही, हेही आपल्याला माहिती आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर सार्वजनिक जीवनामध्ये असलेल्यांनी केला पाहिजे यामध्ये काहीच नवीन नाही. पण याकडे दुर्लक्ष करून त्याची चर्चा करण्यात व जाहिरातबाजी करण्याकडे आपला कल आहे. पंतप्रधानांच्या ताफ्यात दोनच गाड्या येथपासून ते मुख्यमंत्री मोटारसायकलवरून मंत्रालयात, तर महापौर सायकलवरून महापालिकेमध्ये येथपर्यंत सगळे वाजवून सांगितले जात आहे. मुळात पंतप्रधानांच्या ताफ्यामध्ये एरवी यापेक्षा अधिक गाड्या का असतात, त्याची गरज का असते हे कोणी सांगणार नाही. मुख्यमंत्र्यांनी मोटारसायकलवरून जाणे योग्य आहे का, वाटेत अपघात झाला तर त्याची जबाबदारी कोणाची, असे अनेक प्रश्न आहेत. त्यामुळे पंतप्रधानांच्या आवाहनाला आपापली जबाबदारी ओळखून प्रतिसाद देणे योग्य. ते करताना तरतम भाव बाळगला पाहिजे. प्रसिद्धीसाठी एक दिवस स्तोम माजविण्यात अर्थ नाही. या सगळ्याकडे गांभीर्याने बघायला हवेच; पण त्याचबरोबर हा साधेपणा फक्त युद्धजन्य परिस्थितीत नाही तर कायमस्वरूपी असायला हवा. गोव्याचे माजी मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर स्कूटरवरून सकाळी मंत्रालयात जात, पण त्याच्या कधी बातम्या झाल्या नाहीत. लोकांनाही त्याचे अप्रूप वाटत नव्हते, ना मुख्यमंत्र्यांना आपण काही तरी वेगळे करतो आहोत असे वाटत होते. हीच भावना कायमस्वरूपी हवी. शेवटी मुद्दा तोच आहे. 'नीट' च्या परीक्षेचे संचलन असो किंवा पंतप्रधानांच्या आवाहनाला द्यायचा प्रतिसाद, या सगळ्याकडेच पुरेशा गांभीर्याने आणि सातत्याने बघण्याची गरज आहे. उगाचच प्रत्येक गोष्टीची जाहिरात आणि प्रसिद्धी करून आपण नक्की काय साध्य करणार?

**CHANGE NAME**

I am changing my name from **NAZIYA BEGUM MAHAMAD NAWAZ To NAZIYA SHERKHAN PATHAN** for passport issuance as per document.

# एक तरी परीक्षा 'NEET' घ्या....!

५ लाखात नीटचा पेपर, ४२ तास आधी हातात! केरळमध्ये फुटला, राजस्थानपर्यंत पोहोचला, 720 पैकी 600 गुणांचे प्रश्न जसेच्या तसे. हे कुठल्या फिल्म मधील डायलॉग नाही. तर 3 मे रोजी झालेल्या वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी आवश्यक असलेली ठएएळ परीक्षेचा पेपर फुटीतील सामान्य लोकांचे डायलॉग. राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा 'पेपर फुटी' मुळे रद्द करावी लागत असेल, तर तो केवळ प्रशासकीय दोष राहत नाही, तो संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या नैतिकतेवर आणि लोकशाही व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण करणारा प्रसंग ठरतो मंग कुणावर विश्वास ठेवायचा व्यवस्थेवर ? सरकारवर ? प्रत्येक वर्षी ही "नीट" नेटकी परीक्षा का होत नाही ? का विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळतात ?

डॉक्टर होण्याचं स्वप्न उराशी बाळगून तासंतास दोन तीन वर्षे अभ्यास करायचा आणि परीक्षा झाली की असे काहीतरी घटना घडल्यानंतर विद्यार्थ्यांनी, आईवडिलांनी काय करायचे ? "नीट" सारखी परीक्षा ही फक्त एक प्रवेश परीक्षा नाही. तर ती लाखो मुलांच्या स्वप्नांची, आई-वडिलांच्या त्यागाची आणि अनेक वर्षांच्या जिद्दीची आणि संघर्षाची ही कठोर परीक्षा असते. यंदा तब्बल २२ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. असंख्य विद्यार्थ्यांनी दिवस-रात्र अभ्यास केला, मानसिक ताण सहन केला, अनेकांनी सोशल मीडिया, मित्र, आनंद देणाऱ्या कृती, गोष्टी सगळं बाजूला ठेवून फक्त एका ध्येयाने प्रेरित होऊन जीवतोड मेहनत केली. पालकांनी पै पै जमवून, पोटाला टाच मारुन, प्रसंगी कर्ज काढून पोरांच्या शिक्षणावर खर्च केला.

महागडे क्लास लावले. आणि आता बातमी आली की, 'पेपर फुटीमुळे परीक्षा रद्द!'

भारतात पेपर फुटी ही गोष्ट अपवादात्मक घटना राहिलेली नाही. विविध राज्यांतील भरती परीक्षा, शिक्षक पात्रता परीक्षा, पोलीस भरती, रेल्वे भरती, अगदी राष्ट्रीय स्तरावरील वैद्यकीय आणि प्रवेश परीक्षा देखील या संकटापासून मुक्त राहिलेल्या नाहीत. त्यामुळे प्रश्न फक्त 'पेपर कोणी फोडला? कसा फोडला ?' एवढाच नसून 'व्यवस्था इतकी असुरक्षित का आहे?' हा आहे. पेपर फुटी सहजासहजी होत नाही. यामध्ये व्यवस्थेतील लोकं, ॲकॅडमीवाले, कोचिंग क्लासवाले अगदी मोठ मोठी लोकांची साखळी असते. साखळीतील कुठेतरी सुरक्षा, उत्तरदायित्व किंवा नैतिकता कोसळते आणि त्याचा परिणाम लाखो विद्यार्थ्यांवर होतो.

ही केवळ परीक्षा रद्द झालेली नाहीये तर प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या मनावर खोलवर घाव घातला गेलाय. चूक काही मोजक्या लोकांनी केली परंतु शिक्षा मात्र लाखो गुणी, मेहनती मुलांना! इथे विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा, त्यांनी घेतलेल्या मेहनतीचा आणि आयुष्याच्या नाजूक टप्प्याचा विचार कुणीच करत नाही. लाखो मुलांनी परीक्षा दिली तेव्हा हुश्श२२२ म्हणत एकदाची सुटका झाली म्हणून मोठा सुस्कारा सोडला असेल..... पण ?

नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) द्वारे ही परीक्षा दरवर्षी आयोजित केली जाते, ज्यामुळे देशभरातील वैद्यकीय प्रवेशासाठी एकसमान आणि पारदर्शक प्रक्रिया सुनिश्चित होते.

परंतु प्रत्येक वर्षी नीट परीक्षा चर्चेत राहतेच. यावरून ठळअ ने आजपर्यंत कोणताही धडा घेतला नाही. सरकार अनेकदा डिजिटल इंडिया, पारदर्शक परीक्षा व्यवस्था आणि तंत्रज्ञानाधारित प्रशासन यांचा उल्लेख करते. परंतु प्रत्यक्षात परीक्षा रद्द करण्याची वेळ येत असेल, तर या दाव्यांचे मूल्यमापन होणे आवश्यक ठरते. परीक्षा झाली म्हणून गाफील असलेल्या मुलांना परत परीक्षा द्यायची ? मुलांच्या मनावर किती ताण आला असेल ? याचा विचार कोणी करणार आहे की नाही. भविष्यातील डॉक्टर, अभियंता, संशोधक किंवा शिक्षक तयार करणारी परीक्षाच जर सुरक्षित नसेल तर विश्वास कुणावर ठेवायचा....

प्रा. तात्यासाहेब शिवाजी काटकर,
अकलूज ९२२६१४४८३६
(महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक असून ते शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेखन करतात)

## शहाजी फुरडे-पाटील यांना 'भागवत धर्म प्रसारक' पुरस्कार जाहीर

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** गेली अनेक वर्षे वारकरी संप्रदाय, पालखी सोहळे आणि भागवत धर्माचा विचार आपल्या प्रभावी लेखणीतून जनसामान्यांपर्यंत पोहोचविणारे ज्येष्ठ पत्रकार शहाजी फुरडे-पाटील यांना सन २०२६ चा प्रतिष्ठेचा 'भागवत धर्म प्रसारक' पुरस्कार जाहीर झाला आहे. वारकरी परंपरेचा जिव्हाळ्याने अभ्यास करत समाजमनात भक्ती, संस्कार आणि वारीचे महत्त्व रुजविणाऱ्या फुरडे-पाटील यांच्या कार्याचा हा मानाचा गौरव मानला जात आहे.

पंढरपूर व जळगाव येथील श्री संत मुक्ताबाई संस्थान, मुक्ताईनगर यांच्या वतीने हा पुरस्कार दरवर्षी पालखी सोहळ्यात उल्लेखनीय वार्तांकन करणाऱ्या आणि भागवत धर्माच्या प्रचार-प्रसारासाठी विशेष योगदान देणाऱ्या पत्रकारांना प्रदान केला जातो. संस्थेचे माजी अध्यक्ष सहकार महर्षी कै. भाऊसाहेब ऊर्फ प्रल्हादराव पाटील यांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराचे स्वरूप श्री विठ्ठलाची मूर्ती, मानाचा वारकरी फेटा, शाल, श्रीफळ आणि संत मुक्ताबाई चरित्र ग्रंथ



असे आहे. संस्थानचे अध्यक्ष ॲड. रवींद्र पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे या पुरस्काराची घोषणा केली.

लोकमतचे बार्शी तालुका प्रतिनिधी म्हणून गेली वीस वर्षे कार्यरत असलेले शहाजी फुरडे-पाटील यांनी पत्रकारितेसोबतच वारकरी संप्रदायाशी असलेली नाळ अखंड जपली आहे. बार्शी तालुक्यातील कांदलगाव येथील रहिवासी असलेल्या फुरडे-पाटील यांनी मागील तब्बल १८ वर्षांपासून पालखी मार्गावरील वारीचे सातत्यपूर्ण आणि अभ्यासपूर्ण वार्तांकन केले आहे. त्यांच्या लेखणीतून केवळ वारीतील भक्तिभावच नव्हे, तर वारकऱ्यांच्या अडचणी, सामाजिक प्रश्न, धार्मिक परंपरा आणि मूलभूत सुविधांचे प्रश्नही प्रभावीपणे मांडले गेले.

आषाढी वारीदरम्यान श्री संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज तसेच आदिशक्ती मुक्ताबाई पालखी सोहळ्यांवरील त्यांचे लेखन विशेष गाजले आहे. इंदापूर ते पंढरपूर, फलटण ते पंढरपूर तसेच मुक्ताई सोहळ्याच्या वारी मार्गावरील विविध विषयांना त्यांनी सातत्याने वाचा फोडली. आषाढी एकादशी सोहळा, महापूजा आणि पंढरपूर शहरातील धार्मिक वातावरणाचे त्यांनी केलेले जिवंत वार्तांकन वारकरी वाचकांमध्ये विशेष लोकप्रिय ठरले आहे.

सन २००८ मध्ये लोकमतचे तत्कालीन संपादक सुधीर महाजन आणि पंढरपूर कार्यालय प्रमुख प्रताप नलावडे यांनी त्यांना वारी वार्तांकनाची संधी दिली. पहिल्याच वर्षी माऊली पालखी सोहळ्यावर विविध अंगांनी केलेल्या लेखनामुळे त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली. वारकरी पत्रकारितेतील ज्येष्ठ पत्रकार सूर्यकांत भिसे, शंकर टेमघरे, विलास काटे, राजेंद्रकृष्ण कापसे, राजाभाऊ चोपदार आणि पुंडलिक मोरे महाराज यांचे त्यांना लाभलेले मार्गदर्शन त्यांच्या पत्रकारितेला अधिक समृद्ध करणारे ठरले.

भगवंत मंदिरात श्रावण महिन्यात आयोजित जयवंत बोधले महाराजांच्या प्रवचनमालेवर 'बोधवाणी' या सदरातून सलग पाच वर्षे त्यांनी लेखन केले आहे. तसेच पंढरपूर ते मुक्ताईनगर जाणाऱ्या पांडुरंगराय पालखी सोहळ्याच्या परतीच्या प्रवासात बार्शीतील विसाव्याचे नियोजन आणि वारकरी सेवेतही त्यांचा सक्रिय सहभाग असतो.

यापूर्वी हा मानाचा पुरस्कार सूर्यकांत भिसे, शंकर टेमघरे, मनोज मांढरे, राजेंद्रकृष्ण कापसे आणि सुनील लांडगे यांना प्रदान करण्यात आला आहे. यंदा शहाजी फुरडे-पाटील यांच्या रूपाने वारकरी पत्रकारितेतील समर्पित आणि अभ्यासू व्यक्तिमत्त्वाचा गौरव होत असल्याची भावना वारकरी व पत्रकार क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि. २५ जुलै रोजी आषाढी एकादशी निमित्त श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री संत मुक्ताबाई मठात मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

## अन्नछत्र मंडळ हे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात लौकिक- ना.नितीन गडकरी



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु केलेल्या महाप्रसादाच्या सेवेबरोबरच विविध उपक्रम हे उल्लेखनीय आणि धाडशी नेतृत्व व प्रबळ इच्छाशक्तीमुळेच न्यासाचा प्रचंड विस्तार होत आहे. अन्नछत्र मंडळ हे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात लौकिक, धार्मिक व सांस्कृतीकतेचे प्रतिक असल्याचे मनोगत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री ना.नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील स्वामी समर्थ अन्नछत्र (ट्रस्ट) मंडळात आले असता न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत, न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी राजा छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा देखील ना. गडकरी यांना देण्यात आली. त्यांच्या समवेत खासदार ज्योतीताई वाघमारे, आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोटे, सो.मा.प. महापौर विनायक कोंड्याल, सोलापूर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी सोलापूर ग्रामीण, ना. नितीन गडकरी यांचे स्विय सहायक बाळासाहेब ठेंग, मनोज वाडेकर, दिपक शिंदे, अमोल बिराजदार, एन.एच.ए. पुणे प्रकल्प संचालक संजय कदम, सोलापूर एन. एच.ए.चे स्वप्नील कासार, गुरुशांत धुत्तरगावकर, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, दिपक वाघमारे, भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत नाना चव्हाण, अक्कलकोट भाजपा मध्य मंडल अध्यक्ष प्रदीप पाटील आदिजन उपस्थित होते. पुढे बोलताना ना.नितीन गडकरी यांनी म्हणाले की, गडकरी कुटुंबीय आम्ही श्रीक्षेत्र अक्कलकोट निवासी स्वामी भक्तच, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, हे स्वामींची अनुभूतीच आहे, व आमचे श्रध्देय स्थळ आहे. न्यासाच्या वतीने पर्यावरण पूर्वक वसुंधरेची जपणूक केली जात असल्याचे समाधान व्यक्त करून मंडळाकडून समर्थ महाप्रसाद सेवेची माहिती घेऊन न्यासाच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### 'इलेक्ट्रिक बग्गीतून प्रवास'

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांनी ना. नितीन गडकरी यांना श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिर येथून श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आणण्यासाठी इलेक्ट्रिक बग्गीची सोय केलेली होती. दोन इलेक्ट्रिक बग्गीच्या माध्यमातून ना. गडकरी व त्यांच्या समवेत असणाऱ्या पदाधिकाऱ्याना अन्नछत्र मंडळात आणण्यात आले. ही सोय पाहून ना.नितीन गडकरी यांनी अन्नछत्र मंडळाच्या कायार्ची कौतुक करून, पंतप्रधान ना. नरेंद्र मोदी यांच्या आवाहनास श्री स्वामी समर्थ नगरीतून उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे सांगून, गरज ओळखून न्यासाने केलेल्या सोयी बाबत ना. गडकरी यांनी कौतुक केले. याप्रसंगी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, सौरभ मोरे, मनोज निकम, पुरोहित अप्पू पुजारी, प्रवीण देशमुख, विजय माने, सुमित घाडगे, शुभम सावंत, प्रसाद मोरे, साहिल सय्यद, सागर जाधव, किरण साठे, ज्ञानेश्वर भोसले, बाळासाहेब पोळ, धानाप्पा उमदी, विनायक भोसले, नुर खासबागदार, स्वामिनाथ बाबर, मल्लिकार्जुन गवळी, बसवराज निंबाळे, विलासराव रेड्डी, बसवराज क्यार, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, सिद्धराम कल्याणी, बाळासाहेब घाडगे, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, मल्लिकार्जुन बिराजदार, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, समर्थ चव्हाण, कल्याण देशमुख, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, गोरख माळी, पप्पू कोल्हे, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## महाराजस्व समाधान शिबिरांतर्गत तालुक्यातील 11 हजार 787 ग्रामस्थांना विविध योजनांचा मिळाला थेट लाभ -तहसीलदार लंगुटे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर महसूल विभागाशी संबंधित नागरिकांची प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी महसूल विभागाकडून तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान दि.7 मार्च ते 15 मे या कालावधीत राबविण्यात आले.

या अभियानातंर्गत तालुक्यातील 11 हजार 787 ग्रामस्थांना विविध योजनांचा थेट लाभ मिळाला असल्याची माहिती तहसीलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

दिनांक 15 मे रोजी पंढरपूर येथील श्रीयश पॅलेस येथे नगरपालिका स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या मंडळात 3 हजार 288 तर नगरपालिकेमार्फत 60 विविध सेवा व दाखले देण्यात आले.

या अभियानातंर्गत पंढरपूर येथील शिबिरात निकाली काढण्यात आलेले फेरफार 536, सातबारा मधील दुरुस्ती 13, डिजिटल सातबारा 761, 8 अ उतारे 542, प्रमाणपत्रे 1 हजार 22, एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत निकालात काढण्यात आलेले अर्ज 13, अकृषक परवनगीचे दप्तर अद्यावत करणे-2, अद्यावत अभिलेख 08, वर्ग दोन जमिन वर्ग एक करण्याबाबत कार्यवाही 2, तुकडे बंदी कायद्यानुसार खरेदी विक्रीचे व्यवहार नियमानुसार करुन देणे 42, सामाजिक योजना57, शिधापत्रिका 101, कृषी यांत्रिकीकरण, फलोत्पादन व कृषी सिंचन योजना 05, आभा कार्ड

एच.बी, तपासणी व औषधोपचार 179, ई- मोजणी फेरफार नकाशा 05 आदी सेवा व दाखले देण्यात आले.

तसेच नगरपालिकास्तरावर घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू उपलब्ध करुन देणे 13, प्रधानमंत्री आवास योजना बांधकाम

परवाना प्रमाणपत्र वाटप 13, पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी 14, न.पा. क्षेत्रातील लाभार्थी जन्म मृत्यू दाखले 10, वाळू नोंदणी लाभार्थी 10 अशा एकूण 60 लाभार्थ्यांना नगरपालिका प्रशासनाकडून लाभ देण्यात आला असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

यावेळी आमदार समाधान आवताडे, नगराध्यक्षा प्रणिती भालके, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, पंचायत समिती सभापती शुभम आगवणे, उप सभापती प्रमोद देशमुख, प्रांताधिकारी सचिन इथापे, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, दीपक शिंदे आदीसह मंडळाधिकारी, तलाठी, ग्रामस्थ तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

पान १ वरून

## अनंत जाधव यांच्या नगरसेवकपदावर...

भूतकाळातील गंभीर गुन्हेगारी प्रकरणाची संपूर्ण माहिती जाहीर केली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. संबंधित प्रकरणात त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले होते. तसेच त्या प्रकरणात त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती आणि जवळपास पाच वर्षांचा कारावासही भोगावा लागल्याचा उल्लेख याचिकेत करण्यात आला आहे.

विशेष बाब म्हणजे, नंतर या शिक्षेविरोधात उच्च न्यायालयात अपील करण्यात आले आणि ती शिक्षा रद्द झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे. मात्र, याचिकाकर्त्यांचा दावा असा आहे की, शिक्षा रद्द झाली असली तरी संबंधित खटला, त्यातील शिक्षा आणि न्यायालयीन प्रक्रिया यांची माहिती निवडणूक प्रतिज्ञापत्रात नमूद करणे कायद्याने बंधनकारक होते.

मात्र उमेदवारी अजातील संबंधित रकान्यात या माहितीबाबत "लागू नाही" असा उल्लेख करण्यात आल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. यामुळे मतदारांपासून महत्त्वाची माहिती जाणीवपूर्वक लपविण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

याचिकेत पुढे असेही म्हटले आहे की, मतदारांना उमेदवाराची संपूर्ण पार्श्वभूमी जाणून घेण्याचा अधिकार हा लोकशाही प्रक्रियेतील मूलभूत घटक आहे. एखाद्या उमेदवारावरील गुन्हे, शिक्षा किंवा न्यायालयीन इतिहास याबाबतची माहिती लपविणे म्हणजे मतदारांची दिशाभूल करण्यासारखे आहे. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचीही फसवणूक झाल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला आहे.

या प्रकरणात प्रभाग क्रमांक ४ (ड) मधील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार धर्मपाल इंगळे आणि सामाजिक कार्यकर्ते तसेच प्रभाग क्रमांक ४ (ब) चे उमेदवार सुशील बंदपट्टे यांनी संयुक्तपणे याचिका दाखल केली आहे. या याचिकेचे कामकाज ॲड. अनंत वढगावकर पाहत आहेत.

सध्या उच्च न्यायालयात उन्हाळी सुट्टी सुरू असल्याने या प्रकरणाची सुनावणी अद्याप झालेली नाही. मात्र न्यायालयीन कामकाज सुरू झाल्यानंतर या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली जाणार असल्याचे याचिकाकर्त्यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, या प्रकरणामुळे सोलापूरच्या राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. जर न्यायालयात आरोप सिद्ध झाले, तर केवळ एका नगरसेवकाचे पद धोक्यात येणार नाही, तर निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि उमेदवारांच्या माहिती प्रकटीकरणाच्या नियमांवरही मोठी चर्चा रंगण्याची शक्यता व्यक्त होत आहे. आता न्यायालय या प्रकरणात काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महाराष्ट्रात मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्यात मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या पत्रानुसार तसेच मा. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या पुनरीक्षणासाठी अर्हता दिनांक 1 ऑक्टोबर 2026 निश्चित करण्यात आला आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्यामार्फत घरोघरी भेटी देऊन मतदारांची माहिती पडताळली जाणार असून नागरिकांना दावे व हरकती दाखल करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**कार्यक्रमाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील :**

- अर्हता दिनांक : 01.10.2026
- तयारी, प्रशिक्षण व छपाई : 20.06.2026 ते 29.06.2026
- BLO मार्फत घरोघरी भेटी : 30.06.2026 ते 29.07.2026
- मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण : 29.07.2026 पर्यंत
- प्रारूप मतदार याद्यांची प्रसिद्धी : 05.08.2026
- दावे व हरकती दाखल : 05.08.2026 ते 04.09.2026
- नोटीस टप्पा / दावे व हरकती निकालात काढणे : 05.08.2026 ते 03.10.2026
- अंतिम मतदार याद्यांची प्रसिद्धी : 07.10.2026

सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या नावाची खात्री करून आवश्यक बदल, समावेश अथवा वगळण्याबाबत निर्धारित कालावधीत दावे व हरकती सादर कराव्यात, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी किरण सुरवसे यांनी केले आहे.

### वात्रटिका

**प्रतिक्षा न्यायाची**

कित्येक घडल्या घटना
कित्येक घडले गुन्हे...
विसरून जातात लोक
आणि येतात दिवस जुने...
समित्या,चौकश्या आणि
न्यायासाठी स्थापला आयोग...
प्रतिक्षेत आहेत पिडत सगळे
कधी येईल न्यायाचा योग...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# नीट पेपरफुटी प्रकरणी सोलापूरात संतप्त आंदोलन

## मोदी–शहा–प्रधान यांच्या प्रतिमांचे दहन



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** नीट 2026 परीक्षा पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेल्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघाच्या वतीने सोलापुरात जोरदार आंदोलन करण्यात आले. जिल्हा परिषद पूनम गेट येथे झालेल्या या आंदोलनात पंतप्रधान नरेंद्र मोदी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या प्रतिमांचे दहन करण्यात आले.

भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघाचे केंद्रीय समिती सदस्य ॲड. अनिल वासम यांनी आंदोलनादरम्यान तीव्र शब्दांत भूमिका मांडताना सांगितले की, 'दरवर्षी वैद्यकीय शिक्षणासाठी लाखो विद्यार्थी राष्ट्रीय पात्रता परीक्षा (NEET) देतात. मात्र NTA या राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या निष्काळजीपणामुळे आणि भ्रष्ट कारभारामुळे नीट 2026 चा पेपर फुटला. त्यामुळे देशभरातील विद्यार्थ्यांचे मानसिक, शैक्षणिक आणि आर्थिक नुकसान झाले आहे. या धक्क्यातून तीन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या असून, त्यास जबाबदार असणाऱ्या केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा.'

तसेच, 'विद्यार्थ्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या संबंधित यंत्रणा व जबाबदार व्यक्तींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा,' अशी मागणीही त्यांनी केली. शनिवार, दि. १६ मे २०२६ रोजी जिल्हाध्यक्ष विक्रम कलबुर्गी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. 'NTA यंत्रणा रद्द करा', 'NEET ची फेरपरीक्षा पारदर्शक आणि गोपनीय पद्धतीने घ्या', 'विद्यार्थ्यांच्या आत्महत्येस जबाबदार शिक्षणमंत्री राजीनामा द्या', 'चौकशी नको, थेट अटक करा' अशा घोषणा देण्यात आल्या.

आंदोलनावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला असता कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये काही काळ धक्काबुक्की व गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मात्र आंदोलकांनी आक्रमक पवित्रा कायम ठेवत निषेध अधिक तीव्र केला.

यावेळी संघटनेचे राज्य सचिव साथी दत्ता चव्हाण यांनी सरकारवर जोरदार टीका करताना म्हटले की, 'देशातील शिक्षण व्यवस्था खाजगीकरण आणि भांडवलदारांच्या ताब्यात देण्याचे काम सरकार करत आहे. शिक्षणाचे बाजारीकरण आणि व्यापारीकरण झाल्यामुळे प्रत्येक परीक्षा, प्रवेश प्रक्रिया आणि शुल्काचा वाढता बोजा विद्यार्थ्यांवर टाकला जात आहे. मात्र विद्यार्थ्यांचे भवितव्य उद्ध्वस्त होत असतानाही सरकार गंभीर नाही. धर्मांधता पसरविणे, सत्ता हस्तगत करणे आणि जनविरोधी धोरणे राबविणे यामध्येच सरकार व्यस्त असून विद्यार्थ्यांचे भविष्य अंधाराकडे ढकलले जात आहे,' अशी जहरी टीका त्यांनी केली.

या आंदोलनात युवा महासंघाचे जिल्हा कोषाध्यक्ष बाळकृष्ण मल्याळ, विजय हरसुरे, बालाजी गुंडे, राहुल बुघले, सुनील आमाटी, अप्पाशा चांगले, किशोर झेंडेकर, योगेश अकीम, दिनेश बडगू, चंटी बीटला, विजय साबळे, शाम आडम, गोपाल बंडी, पुष्पा गुरुपनवरु, प्रदीप मरेड्डी, नरेश गुल्लापल्ली तसेच विद्यार्थी आघाडीचे राज्य सहसचिव मल्लेशाम कारमपुरी, नानी माकाम, कुमार येलगेटी, अभिजीत निकंबे, गुंडप्पा डक्का, सय्यद शहापूरे, सद्दाम बागवान आदी उपस्थित होते.

# सिंहगडच्या विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय सुवर्णकामगिरी; सोलापूरात विविध स्तरांतून गौरव



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** श्रीलंकेची राजधानी कोलंबो येथे दि. २४ ते २८ एप्रिलदरम्यान पार पडलेल्या साउथ एशियन गोल शॉट बॉल चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेत भारतीय संघाने चारही गटांमध्ये विजेतेपद पटकावत अभूतपूर्व कामगिरी केली. या विजयी संघात सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, केगाव (सोलापूर) येथील तब्बल ८ विद्यार्थ्यांचा समावेश होता.

स्पर्धेसाठी भारतीय संघ चेन्नई येथून विमानाने श्रीलंकेला रवाना झाला होता. स्पर्धेत सब–ज्युनियर बॉईज, सब–ज्युनियर गर्ल्स, यूथ बॉईज आणि यूथ गर्ल्स या सर्व गटांमध्ये भारताने अपराजित कामगिरी करत सुवर्णपदकांची लयलूट केली. प्रत्येक गटात भारताने लीग फेरीपासून अंतिम सामन्यापर्यंत प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखत शानदार विजय नोंदवले.

सब–ज्युनियर बॉईज गटात भारताने अंतिम फेरीत श्रीलंकेवर २३–१८ असा विजय मिळवला, तर सब–ज्युनियर गर्ल्स गटात १९–१६ अशी मात केली. यूथ बॉईज गटात ३६–२७ आणि यूथ गर्ल्स गटात २३–१९ अशा विजयांसह भारताने सर्वच गटांमध्ये सुवर्णपदक पटकावत ऐतिहासिक कामगिरी नोंदवली.

या स्पर्धेत सिंहगड संस्थेच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय प्रदर्शन केले. सब–ज्युनियर गर्ल्स गटात कु. जानवी बुराडे, यूथ गर्ल्स गटात कु. श्रद्धा चव्हाण व कु. आर्या पाटणे, सब–ज्युनियर बॉईज गटात आदित्य गुंड, आशिष बनसोडे व समर्थ मगर, तसेच यूथ बॉईज गटात अथर्व गुर्रम व वरुण सरडा यांनी भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत देशाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

या ऐतिहासिक यशानंतर सोलापूर महानगरपालिकेचे उपमहापौर ज्ञानेश्वर देवकर आणि पर्यावरण दूत मनोज देवकर यांनी विद्यार्थ्यांना महापालिकेत बोलावून झाडांचे रोपटे देत विशेष सत्कार केला. विद्यार्थ्यांच्या आंतरराष्ट्रीय यशाचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

तसेच सरस्वती चौक येथील कॅनरा बँक शाखेतर्फेही यशस्वी विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी शाखा व्यवस्थापक शैलजा हिरेमठ, विनायक दुमालदार, ऋषिकेश होनमाने आणि प्रवीण पंडित यांची उपस्थिती होती. त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भविष्यातील प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

'आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश संपूर्ण सोलापूर जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे. क्रीडा क्षेत्रात सिंहगडचे विद्यार्थी सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत आहेत,' असे त्यांनी सांगितले.

या यशामागे भारतीय संघाचे प्रशिक्षक व क्रीडाशिक्षक राजू ठाकूर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. त्यांच्या तांत्रिक प्रशिक्षण, शिस्तबद्ध सराव आणि मानसिक तयारीमुळे संघाने ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली.

या ऐतिहासिक विजयामुळे सिंहगड पब्लिक स्कूल तसेच सोलापूर जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल झाले असून, विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीकडून पालखी सोहळ्याचे वेळापत्रक जाहीर



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):–** श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे वेळापत्रक देवस्थानने जाहीर केलं आहे. या वर्षीचा श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा आषाढीवारी आळंदी – पंढरपूर पालखी सोहळा ८ जुलै २०२६ ते ९ ऑगस्ट २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे. ८ जुलै रोजी पालखी प्रस्थान सोहळा संपन्न होईल. त्यानंतर पालखीचा पहिला मुक्काम आळंदीमध्ये राहील. ९ जुलै रोजी पालखी सोहळा आळंदीहुन पुण्याकडे मार्गस्थ होईल. ९ व १० जुलै असे दोन दिवस पालखी सोहळा पुणे येथे मुक्कामी राहील.पुण्यातील मुक्कामाबाबत गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चेला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. प्रशासनाकडून मिळालेल्या लेखी हमीपत्रासह जागेच्या विस्तारीकरणाचे आश्वासन विचारात घेऊन, यंदाही पालखीचा मुक्काम भवानी पेठेतील विठोबा मंदिर येथेच करण्याचा निर्णय संस्थान कमिटीने घेतला आहे. तशी माहिती श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीकडून घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी पालखी सोहळा मालक आरफळकर, प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, सोहळा प्रमुख राजेंद्र उमाप, विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे आणि विश्वस्त रोहिणी पवार, दिंडी समाजचे भाऊसाहेब गोसावी हे उपस्थित होते.

**पालखी सोहळ्याचे वेळापत्रक**

यावर्षी आषाढी एकादशी २५ जुलै रोजी आहे. त्यानिमित्त श्री संत ज्ञानेश्वर महाराज आषाढी पायी वारी पालखी सोहळा ९ जुलै –भवानीपेठ पुणे, १० जुलै – पुणे, ११ जुलै – सासवड,१२ जुलै – सासवड, १३ जुलै – जेजुरी, १४ जुलै – वाल्हे, १५ जुलै – लोणंद, १६ जुलै – तरडगाव, १७ जुलै – फलटण, १८ जुलै– बरड, १९ जुलै – नातेपुते, २० जुलै – माळशिरस, २१ जुलै – वेळापूर, २२ जुलै – भंडीशेगाव, ३ जुलै – वाखरी, २४ जुलै – पंढरपूर २५, २६, २७, २८ जुलैला पंढरपूर येथेच मुक्काम असेल तर २९ जुलैला परतीचा प्रवास सुरु होईल. आणि ८ ऑगस्ट रोजी पालखी सोहळा आळंदी मुक्कामी पोहोचेल.

**पालखी सोहळ्यातील माऊलीच्या अश्वांचे रिंगण,,**

१५ जुलैला दुपारी निरा येथे संत ज्ञानेश्वर महाराज पादुकांना नीरा स्नान,१६ जुलैला लोणंद मुक्कामावर निघाल्यावर तरडगाव मुक्कामाच्या आधी चांदोबाचा लिंब येथे दुपारी पहिले उभे रिंगण , २० जुलैला नातेपुते मुक्कामाहून माळशिरस मुक्कामाकडे जाताना सायंकाळी पुरंदवडे येथे पहिले गोल रिंगण.२१ जुलै ला माळशिरस मुक्कामाहून वेळापूर मुक्कामाकडे जाताना खुडुसफाटा येथे दुसरे गोल रिंगण, २२ जुलै ला वेळापूर मुक्कामाहून भंडीशेगाव मुक्कामाकडे जाताना ठाकूरबुवाची समाधी येथे तिसरे गोल रिंगण.२३ जुलैला भंडीशेगाव मुक्कामाहून वाखरी मुक्कामाकडे जाताना बाजीरावची विहिर येथे दुसरे उभे आणि चौथे गोल रिंगण, २४ जुलैला वाखरी मुक्कामाहून पंढरपूर मुक्कामाकडे जाताना पादुकाजवळ ३ रे उभे रिंगण

# शिलाई मशीन वाटपातून महिलांसाठी स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याचे मोठे काम– विकास शिंगाडे



५० टक्के सवलतीच्या दरात शिलाई मशीन महिलांना वाटप केल्याने शिलाई मशीनचा हा व्यवसाय महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी अत्यंत प्रभावी माध्यम आहे तसेच महिलांना घरबसल्या कमी भांडवलामध्ये हा व्यवसाय सुरू करता आला. ज्यामुळे महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची आणि कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्याची उत्तम संधी मिळाली व या व्यवसायामुळे स्वतःचे उत्पन्न आपण कमवू शकतो हा आत्मविश्वास अनेक महिलांमध्ये येणार आहे.

**सोनल मोरे** (पोलीस उपनिरीक्षक)
नातेपुते पोलीस ठाणे

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):–** सुखी संसाराच्या घराचा भक्कम पाया असलेली कर्तबगार महिला आणि या महिलांसाठी स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याचे मोठे काम शिवसेनेचे राजकुमार हिवरकर पाटील यांनी १ मे ते १५ मे या पंधरा दिवसात ३२२५ महिलांना शिलाई मशीन वाटप करून महिलांना व्यवसायाची संधी उपलब्ध करून दिली असल्याचे मत नातेपुते नगरपंचायतीचे मुख्य अधिकारी विकास शिंगाडे यांनी व्यक्त केले.

ते नातेपुते येथे शिवसेना शिंदे गट, राजगड नॉलेज सिटी व राजगड पतसंस्थेच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंती शताब्दी निमित्त दिनांक १ मे ते १५ मे पर्यंत राबवण्यात आलेल्या महिलांसाठी ५० टक्के सवलतीच्या दरात शिलाई मशीन वाटप कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी बोलत होते. यावेळी शिवसेना शिंदे गट ओबीसी सोलापूर जिल्हा प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील, नातेपुते नगरपंचायत चे मुख्याधिकारी विकास शिंगाडे महिला पोलीस उपनिरीक्षक सोनल मोरे, डॉ. नरेंद्र कवितके,महात्मा फुले दूध संघाचे चेअरमन रणजीत जठार, भाजपाचे सुनील बनकर, मनोज जाधव, शिवसेनेचे शहर प्रमुख पोपट शिंदे, रियाज शेख, सागर भोसले, अजय टेंबरे, मंगेश कांबळे, विजय टेंबरे, रामदास बरडकर, संदीप काळे आदी मान्यवर या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते दिनांक १५ मे रोजी ५० टक्के सवलतीच्या दरातील शिलाई मशीन वाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला असून माळशिरस तालुक्यासह इतर बाहेरील तालुक्यातील ३२२५ महिला कुटुंबीयांनी शिलाई मशीन वाटपाचा लाभ घेतला.

# शहरातील 2011 पूर्वीची निवासी अतिक्रमणे होणार नियमित

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):–** राज्य शासनाच्या निर्णयानुसार 01 जानेवारी 2011 पूर्वी सरकारी जमिनीवर झालेली निवासी अतिक्रमणे नियमित करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, पंढरपूर शहरातील पात्र नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह तातडीने अर्ज दाखल करावेत, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

महसूल व वनविभागाने 25 मार्च 2026 रोजी जारी केलेल्या शासन निर्णयामुळे अनेक वर्षांपासून सरकारी जागेवर वास्तव्यास असलेल्या हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयामुळे त्यांच्या घरांना कायदेशीर मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शासन निर्णयानुसार 1 जानेवारी 2011 पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमित करण्यात येणार आहेत. 500 चौरस फुटांपर्यंतचे अतिक्रमण विनामूल्य कायम करण्यात येणार असून, 500 ते 1500 चौरस फुटांपर्यंतच्या अतिरिक्त क्षेत्रासाठी बाजारमूल्याच्या दहा टक्के शुल्क आकारले जाणार आहे.

शहरी भागातील नागरिकांनी पंढरपूर नगरपरिषद येथील मुख्याधिकाऱ्यांकडे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.अजासीबत मतदार यादीतील नाव, वीज बिल, मालमत्ता कर पावती, नगरपालिका हद्दीतील रहिवासाचे पुरावे सादर करणे आवश्यक राहणार आहे. तसेच महाराष्ट्रात एकच घर असल्याचे शपथपत्रही द्यावे लागणार आहे.

अर्जाचा नमुना नगरपालिका नगररचना विभागात पाहायला मिळेल. शहरातील पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज विहित नमुन्यात सादर करावेत. या संदर्भात अधिक माहितीसाठी मुख्याधिकारी नगरपरिषद पंढरपूर यांच्या संपर्क साधावा असे आवाहन प्रांत अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

# NEET पेपर सेटर प्राध्यपकानेच पेपर फोडला?




**मुंबई (कटूसत्य वृत्त):–** वैद्यकीय शिक्षणासाठी पात्र ठरणाऱ्या नीट (NEET) पेपरफुटी प्रकरणात मोठा मासा सीबीआयच्या (CBI) हाती लागला आहे. लातूरमधील निवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी याला अटक करण्यात आली आहे. नीटचा पेपर पी. व्ही. कुलकर्णी यानेच सेट केला होता. त्यानेच तो पेपर फोडल्याचा संशय सीबीआयला आहे. त्यानुसार आता कुलकर्णीकडे सीबीआय चौकशी करत आहे.

**कागदपत्रे, मोबाइल जप्त**

नीट पेपर फुटीप्रकरणी नाशिक, अहिल्यानगर, पुणे, लातूर अशा चार शहरामध्ये चार आरोपी सीबीआयने अटक केले आहेत. त्यामुळे तपासाच्या दृष्टीने लिंक सापडली आहे. निट पेपर फुटीप्रकरणी नाशिक, अहिल्यानगर, पुणे, लातूर अशा चार शहरामध्ये चार आरोपी सीबीआयने अटक केले आहेत. त्यामुळे तपासाच्या दृष्टीने लिंक सापडली आहे. सीबीआयचे एक पथक लातूरमध्ये सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी यांच्या घरी दाखल झाले आहे. सेवानिवृत्त प्राध्यापकाला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्या घरातील काही कागदपत्रे व मोबाइल जप्त करण्यात आले आहेत.

**ब्यूटी पार्लर चालविणाऱ्या महिलाच्या संपर्कात**

पेपर लीक प्रकरणी पुण्यात ब्युटी पार्लटर चालविणाऱ्या मनीषा वाघमारे हिला अटक करण्यात आलेली आहे. तिच्या कॉल डिटेल्सनुसार ती महिला सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी याच्या संपर्कात होती. त्यानुसार निवृत्त प्राध्यापकाला सीबीआयने अटक केलीय.

**पेपर सेट केला अन फोडला ही ?**

अटक करण्यात आलेला सेवानिवृत्त प्राध्यापक हा नीट (NEET)च्या पेपर सेट करणाऱ्यापैकी एक असल्याचे समोर येत आहे. या सेवानिवृत्त प्राध्यापकाला आता अटक करण्यात आली आहे. त्यामुळे हा पेपर कसा फुटला आणि किती पैशांसाठी फोडला हे समोर येऊ शकतो. या प्राध्यापकाला अटक केल्यानंतर लातूरमधील कोचिंग सेंटर आणि काही महाविद्यालयाचे प्राध्यपकांचा सहभाग आहे का याचा शोध सुरू झाला आहे.

# 'कटूसत्य' च्या बातमीची दखल; करमाळ्यातील उघड्या वीज डीपी महावितरणकडून बंद



**करमाळा (कटूसत्य वृत्त):–** करमाळा शहरातील काही ठिकाणी उघड्या अवस्थेत असलेल्या वीज डीपींमुळे नागरिकांच्या, विशेषतः लहान मुलांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याबाबत आज कटूसत्य वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीची दखल घेत Maharashtra State Electricity Distribution Company Limited प्रशासनाने तातडीने कार्यवाही केली आहे. शहरातील उघड्या डीपींचे दरवाजे बंद करण्यात आल्याने नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे.

करमाळा शहरातील विविध भागांत वीज डीपींचे दरवाजे उघडे असल्याने अपघाताची शक्यता निर्माण झाली होती. विशेषतः लहान मुले कुतूहलापोटी त्या डीपीजवळ गेल्यास गंभीर दुर्घटना घडू शकत होती. याशिवाय सध्या सुरू असलेल्या अवकाळी पावसासह वादळी वाऱ्यामुळे या उघड्या डीपी अधिक धोकादायक ठरत असल्याची बाब समोर आली होती.

या संदर्भातील वृत्त आज कटूसत्य वृत्तपत्रात प्रकाशित झाल्यानंतर महावितरणने तात्काळ दखल घेत संबंधित ठिकाणी कर्मचाऱ्यांना पाठवून उघड्या डीपींचे दरवाजे बंद केले. त्यामुळे संभाव्य धोका टळला असून नागरिकांनी प्रशासनाच्या या कार्यवाहीचे स्वागत केले आहे.

स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने माध्यमांनी मांडलेल्या प्रश्नाची प्रशासनाने त्वरित दखल घेतल्याने पत्रकारितेच्या माध्यमातून जनहिताचे प्रश्न मार्गी लागू शकतात, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे. तसेच शहरातील इतर वीज यंत्रणांचीही तपासणी करून सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्युट मधील इलेक्ट्रिकल वायरमन कॉम्प्युटर ऑपरेटर कोर्सेसचे निकाल जाहीर



**सातारा (कटूसत्य वृत्त):–** फेब्रुवारी 2026 मध्ये झालेल्या महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ मुंबई (MSBSVET) बोर्डा द्वारे घेण्यात आलेल्या पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्युट सातारा मधील 1) इलेक्ट्रिकल वायरमन व 2) कॉम्प्युटर ऑपरेटर विथ ट र ऑफीस कोर्सेस च्या परीक्षेचे निकाल जाहीर झाले असून सविस्तर निकाल पुढील प्रमाणे

1) इलेक्ट्रिकल वायरमन_ सदर अभ्यासक्रमाचा निकाल 100% लागला असून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे – कुलदीप जगदाळे 84.75% सातारा,

ओंकार शिरसागर 84.75% काळोशी सातारा , अनुज शिंदे 84.50 % कळंगवाडी वाई , पार्थ काटकर 84% डिस्कल खटाव, राजेश देवकर 84% वडुथ सातारा, शुभम माने 84% काळोशी सातारा , श्रेयस सकते 83.50% पाडली कोरेगांव , साहिल सुतार 82.5 % करूगळी सांगली , प्रीतम संकपाळ 82.25% शाहूपुरी सातारा, नारायण राठोड 82% नेर खटाव, प्रणव दुधाने 82%, भोसे महाबळेश्वर, अतिक मानकर 79.5% महाबळेश्वर , आशिष कदम 79% मुनावले जावली , किरण देवकाते 78.75 % कोडोली सातारा, आर्यन शिंदे 77.25 % सातारा

2) कॉम्प्युटर ऑपरेटर विथ टर ऑफीस – सदर अभ्यासक्रमाचा निकाल 100% लागला असून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे कु शिवानी चव्हाण 88% धावडशी सातारा कु साक्षी देशमुख 87.75 % शाहुपुरी सातारा, कु अस्मिता पवार 81.5% म्हसवे सातारा , केतन भोसले 81% गोडोली सातारा , नेहा कुचेकर 80.25% तारळे पाटण, कु प्राची भोंडे 79.5% सातारा, कु प्रणिता संकपाळ शाहुपुरी सातारा इ. वरील कोर्सेस च्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाची मार्कलिस्ट संस्था मधून ऑफीस वेळेत घेऊन जावीत . सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष प्रा. सुनीलकुमार पाटील प्राचार्य सुजित पाटील कु स्नेहल पाटील, वर्षा शिंदे यांनी अभिनंदन केले.

या कोर्स व्यतिरिक्त संस्थेमध्ये इलेक्ट्रिकल सुपरवाइजर , मोटर वाइंडिंग , ऑटोमोबाइल मैकेनिक टेक्नीशियन , टू थ्री फोरव्हीलर मैकेनिक, पीसी मेंटेनेंस , एसी मैकेनिक ई . कोर्सेस चे प्रशिक्षण दिले जाते.

सदरहू कोर्सेस ना शैक्षणिक पात्रता 10 वी, 12 वी पास / नापास असून कॉलेजच्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येतो.

सर्व अभ्यासक्रम मराठी व इंग्रजी मधून शिकवले जातात.

प्रत्येक कोर्स साठी स्वतंत्र प्रॅक्टिकल लॅब, थियरी वर्ग उपलब्ध आहेत.

तसेच विविध बोर्डाच्या परीक्षा होतात. विद्यार्थ्यांना येण्या जाण्यासाठी बस पास ची सुविधा असून प्रशिक्षण पूर्ण केल्या नंतर विविध MNC कंपनी मध्ये प्लेसमेंट दिली जाते.

माहिती पत्रक व प्रवेश फॉर्म ची किंमत रु १००/ व मनी ऑर्डरने रुपये १२५/ पाठवा

प्राचार्य पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्युट प्लॉट नंबर 11 राधिका रोड S T स्टँड जवळ सातारा मो 9822097071ऑफीस वेळ सकाळी 10 ते 6 या वेळेत संपर्क साधावा Email patilinstitutesatsra@gmÔil.com (23042026)

# 22 मे रोजी जिल्हा नियोजन समितीची बैठक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** मंत्री ग्रामविकास व पंचायतराज महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष जिल्हा नियोजन समिती सोलापूर पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर जिल्हा नियोजन समितीची बैठक शुक्रवार दि. 22 मे 2026 रोजी सकाळी 11.00 वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह नियोजन भवन सोलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे.

**बैठकीची विषयसूची पुढीलप्रमाणे :–**

- बैठकीत जिल्हा नियोजन समितीच्या मागील बैठकीचा इतिवृत्तांत व त्यावरील कार्यवाही अहवालास मान्यता देणे.
- जिल्हा वार्षिक योजना सन 2025–26 अंतर्गत सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेच्या दि. 31 मार्च 2026 अखेरच्या खर्चास मान्यता देणे.
- तसेच जिल्हा वार्षिक योजना सन 2026–27 च्या कामांच्या प्रारूप आराखड्यास मान्यता देणे.आदी विषयांवर चर्चा होणार आहे.
- तसेच मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषयही चर्चेस घेण्यात येणार आहेत.
- सदर बैठकीस संबंधित अधिकारी व सदस्यांनी परिपूर्ण माहितीसह स्वतः उपस्थित रहावे. प्रतिनिधी पाठवू नयेत, असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कातीर्केयन यांनी केले आहे.